# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | OCTOBER 2023 | No. 09


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

नीतिसूत्रे २४:१-१०

१) दुर्जनांचा हेवा करुं नको, त्यांच्या संगतीची इच्छा धरु नको.

२) त्यांचे अंत:करण बलात्कार करण्याचा बेत करितें, त्यांच्या वाणींतून घातपाताचे बोल निघतात.

३) सुज्ञानाच्या योगे घर बांधिता येते; समंजसपणानें तें मजबूत राहते.

४) ज्ञानाच्या योगे त्याच्या खोल्या सर्व प्रकारच्या मोल्यवान व मनोरम वस्तूंनी भरून जातात.

५) सुज्ञ पुरुष बलवान असतो, ज्ञानी मनुष्य आपले बल दृढ करितो.

६) शहाणपणानें व्यवस्थाकरून युद्ध चाली व, बहुत सुमंत्री असल्यानें यश मिळते.

७) ज्ञान मुर्खाच्या आटोक्याबाहेर असतें, वेशीवर तो आपले तोंड उघडीत नाही.

८) जो दुष्कर्म करण्याचे योजितो, त्याला लोक घातकी माणूस म्हणतात.

९) मूर्खाचा विचार पापरूप असतो; धर्मनिंदकाचा लोकांस वीट येतो.

१०) संकटकाली तुझें धैर्य खचलें; तर तुझी शक्ति अल्प होय.

## तुम्हाला असामान्य कृत्य करण्या करीता ईश्वरी हुकुम देण्यात आला आहे.

(पास्टर अन्जेलिना सेल्वाकुमारी)



You are divinely summoned to accomplish extra-ordinary deeds!

दानीएल ११:३२ हे वचन आपल्याला आठवण करून देत आहे, की देवाने आपल्याला सामान्य जीवन जगण्याकरिता पाचारण केलेले किंवा निर्माण केलेले नाहि.

**"...पण जे लोक आपल्या देवास ओळखितात ते बलवान होऊन थोर कृत्ये करितील."** (दानीएल ११:३२).

त्याच्या लोकांनी आत्मिक रित्या परिपक्व कोणत्याहि आवाहानात्मक परिस्थितीला धैर्याने पुढे जात असताना-विरोध करीत असताना, आपली ताकद (विश्वास) प्रदर्शित करीत असताना आत्मिक परिपक्व असावे.

असामान्य विश्वासापर्यंत सामान्य रितीने पोहंचणे शक्य नाही हे येशूला ठाऊक होते; आणि त्यामुळेच त्याने आपल्याला पवित्र आत्मा जो आपली ताकद-बळ (विश्वास) प्रदर्शित करण्यास अधीकार देईल तो देण्याचे अभिवचन दिले आहे.

प्रेषित १:८ वचनात म्हटले आहे, "**तुम्हांला सामर्थ्य (पवित्र आत्मा) प्राप्त होईल तो**

(...पान ४ वर)




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**CHIEF EDITOR**

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**

Bro. N. Prakasam, M.A., General Manager
Dr. Rabinder Boaz, M.S.
Bro. K. Puratchivendan

**EDITORIAL BOARD**

Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**E.mail ID**

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**

Echo of His Call


**"देव एक गोष्ट बोलला आहे, सामर्थ्य देवाचें आहे; मी दोनदा ऐकले आहे."** (स्तोत्र ६२:११)

प्रभुमधील प्रियांनो!

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अतुल्य नामात तुम्हाला शुभेच्छा देत आहोत.



Dr. A. Richard Samuel

आम्हाला कळविण्यात दुःख होत आहे. आमच्या **एको ऑफ हिज कॉल** इंग्रजी मासिकाचे सहसंपादक बंधु डॉ. अे. रिचर्ड सॅम्युएल, एम्.ए., पी.एच्.डी, यांनी ३० ऑगस्ट २०२३ रोजी इहलोकीची यात्रा संपवून गौरवात प्रवेश केला. हल्ली त्यांची प्रकृति ठीक नव्हती. ते आमच्या सोबत प्रदिर्घ काळापासून त्यांच्या लिखाणा द्वारे संदेश आणि समोपदेशा द्वारे सेवेत सहभागी होते. कृपया त्यांची पत्नी लेकरे आणी नातवंडे यांची या कठीण समयात प्रार्थनेत आठवण करा.

२ तिमथी ४.२ या वचनात "**वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा,**" सांगण्यात आल्यानुसार आम्ही वेगवेगळ्या मार्गांनी देवाच्या वचनाची घोषणा करण्यास पराकाष्टेचे प्रयत्न करीत आहोत. :-

- ☛ अनेक भाषांमध्ये मंडळीच्या उपासना घेऊन.
- ☛ तामिळ, इंग्रजी आणि हिन्दी भाषांमध्ये **बायबलकोअर** अभ्यासक्रम पत्रव्यवहारा द्वारे उपलब्ध करुन.
- ☛ तामिळ आणि इंग्रजी भाषेत पत्रव्यवहारा द्वारे **थियॉलॉजीकल** अभ्यासक्रम करण्याची संधी देवून.
- ☛ सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल (गावातील हायस्कूल) ज्या मध्ये विषय इंग्रजी भाषेत शिकवले जातात.
- ☛ वेगवान गतीने १६ भाषेत छपाई करणारे अद्यावत मुद्रणालय चालवून.
- ☛ गरिबांच्या सामाजीक उन्नती करिता कार्यक्रमांचे आयोजन करून.
- ☛ विविध भाषांमध्ये महासभा आयोजीत करुन.
- ☛ तामिळ, इंग्रजी, तेलगू आणि हिन्दी भाषांमध्ये येशू ख्रिस्ताची प्रेमळ सुवार्ता **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलच्या माध्यमातून अबाधीतपणे सुरू ठेवून.
- ☛ तीन बायबल कॉलेज चालवून : नहेम्या बायबल कॉलेज (निवासी आणि सायंकालीन) हिन्दी आणि तामिळ भाषेत.

आम्हाला या सर्वा द्वारे विधायक परिणाम प्राप्त होत आहेत आणि आम्ही सर्व समयी देवाला त्याच्या कृपेबद्दल गौरव देतो. आम्ही सर्वजण आमच्या सेवाकार्याला आधार देत असलेल्या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करितो.

## यूट्युब सेवा कार्याची वाढ

पूर्वी आत्मीक जगतात अशी समजूत होती की, आपण टि.व्ही., इंटरनेट, मोबाईल फोन, आणि युट्युब अशा आधुनिक साधनांचा वापर टाळावा. आम्ही त्याच मताचे होतो तथापि, नजीकच्या काळात सामान्य लोकांनी परंपरागत बातम्यांचे उगमस्थान असणाऱ्या वर्तमानपत्र, रेडिओ आणि पुस्तके या वर भरोसा करणे कमी केले आहे. ते देखील वैयक्तीक रित्या कांही आत्मिक सभांना उपस्थित राहातात. परंतु कांही ऑनलाईन उपासनेत सहभागी होतात.

**Our Ministries:** ☼ ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ☼ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ☼ Media Ministry ☼ Online Courses ☼ Theological Correspondence Courses (2 languages) ☼ Church Planting ☼ Nehemiah Bible Colleges ☼ Gospel Printing Press ☼ Great Commission Partners ☼ St. Paul's Matriculation School ☼ Crusades ☼ Community Development

## मोबाईल किंवा सेलफोन

सध्या सर्व पिढ्यांतील लहान लेकरांपासून ते प्रौढांपर्यंत आणि वयस्करांपर्यंत सर्वजण, मग त्यांची आर्थिक स्थिती कशी का असेना, त्यांच्याकडे एक किंवा अधिक फोन असतात. प्रत्येक मोबाईल फोन साठी अनेक सीम कार्ड असतात. जगभरात असे कोट्यावधी फोन उपयोगात आहेत.

आपण एकाचवेळी हजारों लोकांपर्यंत पोहचण्यासाठी - संपर्क साधण्याकरिता या मोबाईल फोनचा वापर करतो, ज्याला आत्मिक लोक अनुकूल नव्हते. जरी त्यांच्या वापरात अविधायक परिणाम जोडलेले आहेत, आपण या मोबाईलचा उपयोग आधुनिक लोकसंख्येच्या गटांना शुभवर्तमान देण्याकरिता उपयोग करितो.

लोक सेलफोनचा उपयोग जागतिक बातम्या आणि विविध मनोरंजनाचे कार्यक्रम पाहाण्यास आणि ऐकण्यास करतात, त्यांना सुवार्ता संदेश ऐकण्याची देखील संधी असते. पूर्वी आम्ही दूरदर्शन संचावर चित्रपट, नाटके आणि जागतिक बातम्या प्रसारित होत असताना देखील १५ मिनीटांचा प्रभुचा संदेश देत होतो. या प्रयत्ना द्वारे आम्हाला विधायक परिणाम प्राप्त होत होते आणि त्याचाच परिणाम सध्या पूर्णवेळ ख्रिस्ती आध्यात्मिक संदेश प्रसारीत करणारे चॅनल सुरु झाले आहेत. या प्रगतीचा होत असलेला लाभ नाकारता येणार नाही.

सेलफोन हे घातक साधन असूं शकते, आम्ही आमच्या **एको ऑफ हीज कॉल** यूट्युब चॅनलची सार्वकालीक नाशाकडे वाटचाल करीत असलेल्या आणि आत्महत्तेचा निर्णय घेणाऱ्या लोकांना येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याविषयी सांगून त्यांची सुटका करण्याच्या उद्देशाने निर्मिती केली आहे. आम्ही दररोज पहाटे ५ वाजता तामिळ, इंग्रजी, हिन्दी आणि तेलगु भाषेत या जगातील लोकांची मुक्तता करण्याच्या उद्देशाने थोडक्यात संदेश प्रसारीत करीत असतो. लाखो लोक त्यांच्या सेलफोनचा जगीक गोष्टिंमध्ये रममाण होण्यात उपयोग करीतात, हे जरी खरे आहे, तरी त्याच उपकरणाचा उपयोग त्यांना ख्रिस्त विरहीत जीवन जगण्याच्या परिणामापासून वाचविण्यासाठी होऊ शकतो. त्यामुळे आम्ही या औद्योगीक कला-शास्त्रा द्वारे या लोकांना संदेश देण्यासाठी उपयोग करीतो आणि त्याचा लाभ जगभरातील विविध विश्वासातील लोकांना होतो आणि आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या प्रेमळ काळजीत समाधान - सांत्वन प्राप्त होते.

## आम्ही येथे काही साक्षी (अनुभव) देत आहोत

*"मला अध्यात्मिक जीवनात थकलेला-भागलेला असे वाटत होते. तुमच्या संदेशाने मला सांत्वन प्राप्त झाले आणि मी त्या स्थितीतून बाहेर आलो."*

*"जीवनातील विविध परिस्थितीमुळे मला जगावेसे वाटत नव्हते. यूट्युब चॅनलवरील तुमच्या प्रार्थनांमुळे मला जगण्याची इच्छा शक्ति प्राप्त झाली."*

*"मी आजारी आणि बिछान्याला खिळलेला असा होतो. तुमच्या यूट्युब चॅनलवर दिल्या गेलेल्या साक्षी मुळे मला आरोग्य प्राप्त झाले. मी बरा झालो."*

*"आम्ही कुटुंबिय तुमचे संदेश ऐकतो न प्रार्थनेत सहभागी होत असतो. आमच्या कुटुंबाने सहभागीता आणि आरोग्य अनुभविले."*

*"मी सेवानिवृत्त असा देवाचा सेवक आहे. तुमच्या युट्यूब चॅनलने मला पुष्कळ काम दिले आहे. मी तुमचे तामिळ, तेलगु, इंग्रजी आणि हिन्दी भाषेतील संदेश ऐकतो आणि ते मी ज्या इतर गटात सहभागी आहे त्यांना ते पाठवित असतो. हे माझे पूर्णवेळेचे काम बनले आहे. हि सेवा अतिशय उत्तम आहे आणि तुमचें संदेश खरोखर आशीर्वादीत आहेत. ते जगभरातील लाखो लोकांचा उद्धार करीत आहेत. हि सेवा सतत करीत राहा. मी तुम्हाला मागील ५० वर्षांपासून ओळखत आहे आणि तुमची सेवा विसरु शकत नाही."*

*"तुमचे युट्यूब चॅनलवरील संदेश दररोज सकाळी ऐकण्यास सुरुवात केल्यापासून आम्ही आमच्या मंडळीच्या उपासनेत नियमितपणे सहभागी होऊ लागलो आहोत आणि आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची उपासना आत्म्यानें आणि खरेपणाने करीत आहोत. संदेशा नंतर तुम्ही करीत असलेली प्रार्थना ऐकून मी इतर कांही करण्यास सुरुवात करण्या अगोदर वैयक्तिक आणि कौटुंबिक प्रार्थना करणे सुरु केली आहे."*

असेच अनुभव आलेल्या अनेक व्यक्तिंकडून आम्हाला प्रतिसाद प्राप्त होत आहेत. याच कारणास्तव आम्ही युट्यूब चॅनल सेवेस सुरुवात केली आहे. देवाची इच्छा पूर्ण व्हावी याकरीता कृपया प्रार्थना करा.

या सर्व साक्षीं बद्दल आम्ही आभारी आहोत आणि जगभरातील या सेवेच्या द्वारे होत असलेल्या प्रभावाबद्दल आनंद करीत आहोत.

तुम्हाला आवड असेल तर +९१-९८४१०७१८५८ या फोन क्रमांकावर एको ऑफ हीज कॉल चॅनलचे वर्गणीदार व्हा.

तुम्ही ९८४१२७१८५८ या क्रमांकावर माझ्याशी थेट संपर्क देखील साधू शकता.

कृपया हे दोन्ही मोबाईल क्रमांक तुमच्या सेलफोन मध्ये संग्रहीत ठेवा, कारण तुमच्याशी जवळची सहभागीता ठेवण्याची आमची इच्छा आहे. या सेवेत आमच्या सोबत सहभागी असलेल्या सर्वांकरीता प्रार्थना करा.

सेवाकार्यात अधिक सुधारणा व्हावी आणि आम्हाला उत्तेजन प्राप्त व्हावे या करीता तुमच्या सुचनांची आणि पाठबळाची अपेक्षा करीत आहोत.

आम्हाला विविध प्रकारच्या आत्मिक संघर्षाला सामोरे जावे लागते आणि आमच्या बरोबरीने सेवा करीत असलेले सेवक शरीरात वेगवेगळ्या प्रकारच्या अशक्तपणाने पीडीत आहेत. तुमच्या रक्षणा करिता आम्ही प्रार्थना करीत आहोत. देवाची कृपा तुम्हां सर्वांसह राहो. अमिन!

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि**
**ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(...पान १ वरुन)

**तुम्हाला त्याच्या विषयी साक्ष देण्यास, सर्व परिस्थितीत विश्वास प्रदर्शीत करण्यास लागणारी शक्ती देईल.**'' आपण येशूच्या शिष्यांच्या जीवनाचे, परिक्षण केले तर; आपल्याला त्यांना पवित्र आत्मा प्राप्त होण्याच्या अगोदरच्या आणि प्राप्त झाल्या नंतरच्या त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल आढळून येईल. पेत्र, ज्याने येशूला थोडक्या लोकांसमोर तीनदा नाकारिले, त्याला धैर्याने हजारो लोकांच्या जमावापुढे शुभवर्तमान संदेश देणे शक्य झाले. त्याला हे सामर्थ्य कोठून प्राप्त आहे? ते त्याजमध्ये कार्य करणारे पवित्र आत्म्याचे सामर्थ्य होते.

## विश्वास जो कार्य करितो!

प्रे. कृ. ३रा अध्याय एका सामान्य व्यक्तिस असामान्य व्यक्तित बदलण्याच्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याविषयी भावी जो बदल विश्वासाच्या द्वारे कसा प्राप्त होऊ शकतो या स्पष्ट रितीने सादर करीत आहे. आपण जेव्हा आपल्या कृतिस विश्वासाची जोड देतो तेव्हा काय घडते याचे उदाहरण दिलेले आहे. पवित्र आत्म्याचे सामर्थ्य प्राप्त झाल्या नंतर शिष्याद्वारे जो पहिला चमत्कार करण्यात आला त्या विषयी सांगण्यात आले आहे.

## प्रे. कृ. अध्याय ३ पेत्र आणि योहान

### चला या उताऱ्याचा खोलवर अभ्यास करुया :-

पेत्र, योहान आणि पांगळ्या मनुष्याच्या जीवनातील तो एक सर्वसाधारण दिवस असावा - आपल्या अर्थबोधा करिता त्या पांगळ्या व्यक्तिस टॉम म्हणू या.

या तीघांनीहि आपल्या दैनिक जीवन क्रम सुरू केला असणार आणी मंदिराकडे जाण्यास तयार झाले असतील. पेत्र आणि योहान प्रभुची आराधना करण्याकरीता आणि पांगळा मनुष्य दिवसभराची कमाई मिळविण्यासाठी गेले असणार. आजचा दिवस जीवनास कलाटणी देणारा ठरेल हे त्यांना जाणवले असेल असे मला वाटत नाहि.

### गोष्टीची पार्श्वभूमी :-

दररोजच्या दिनचर्ये नुसार पेत्र आणि योहान त्या दिवशी देवाच्या मंदिराकडे गेले असताना, मंदिराच्या प्रवेशद्वारात ''दान'' मिळावे यासाठी त्याला दररोज उचलून आणून बसविण्यात येत असलेल्या पांगळ्या टॉमची गाठ पडली टॉम हा जन्मतःच पांगळा होता आणि आता जवळपास ४० वर्षे वयाचा होता. परिसरातील बहुतेक सर्व यहूदि लोकांच्या तो परिचयाचा असावा दररोज हजारों लोकांचे मंदिरात येणे-जाणे असेल, या टॉमकडे अनेकांचे लक्ष जात असेल आणि त्यापैकी काहीजण त्याला पैसे देत असतील, तर काहि त्याजकडे दुर्लश करून निघून जात असतील.

दुःखदायक गोष्ट हि कि या व्यक्ति त्याच्या जीवनाची चार दशके मंदिराच्या बाहेर बसण्यात खर्च केली. तुम्ही त्याला विचारल्यास कदाचीत तो मंदिराच्या सर्व चाली-रिती, मंदिरात येणाऱ्या लोकांची नावे आणि त्यांच्या कुटुंबाविषयी तपशीलवार माहिती सांगू शकेल. चार दशकापासून मंदिराच्या बाहेर बसत असल्यामुळे तो मंदिराच्या सर्व पुढाऱ्यांना ओळखत असेल आणि मंदिरात गाईली जात असलेली गीते त्याला येत असतील त्याने अनेक संदेश ऐकले असतील, तरी देखील तो मंदिराच्या बाहेर बसून होता. त्याला मंदिराच्या आत नेण्यास कोणी देखील नव्हता.

हे नेहमीच्या सरावातील वाटते नां ? आपल्या पैकी काहि जण असे आहेत. देव कोण आहे हे आपल्याला माहित आहे, त्याच्या महत्कृत्यांविषयी, त्याच्या सामर्थ्याविषयी आपण ऐकले आहे आणि अनेक संदेश ऐकले आहेत, गीते गाईली आहेत. परंतु त्याच्या समक्षतेच्या बाहेर-दूर देवाशी समोरा समोर गाठ पडणे शक्य होत नाहि, आपल्या पैकी कांहि जण भूतकाळातील किर्ती बद्दल गाणे गातात, आम्ही असे होतो, तशे होतो, परंतु सध्या काय? ख्रिस्ताबरोबरचे चालणे कोठे गेले? तुम्ही त्याच्या समोर - समक्षतेत आहा कि बाहेर-दूर आहात.

टॉमला मंदिराच्या आंत घेऊन जाणारे कोणी नव्हते, तुम्ही जर देवाच्या समक्षते पासून दूर-अगदी दूर असाल, तर प्रभु करो, हा संदेश तुम्हास देवाच्या जवळ घेवून येवो.

त्या दिवशी टॉम नेहमी प्रमाण पैसे मागत

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

ECHO OF HIS CALL 1969-2019 REACHING NATIONS

Regd. Candidate for Membership ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL Estd. 1969

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले **54** वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

**ईश्वरविद्या सर्टीफिकेट : अेक वर्ष**
**ईश्वरविद्या डिप्लोमा : दोन वर्ष**
**ईश्वरविद्या पदवीधरः तीन वर्ष**

**योग्यता 10 वी या अधिक**
**जल्दी करें!**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ ऑक्टोबर ते १८ नव्हेंबर २०२३ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे

**१९ ऑक्टोबर** : आमच्या १९६९ सालापासून सुरु असलेल्या मासिक सेवा कार्यावर असलेल्या देवाच्या आशीर्वादा बद्दल.

**२० ऑक्टोबर** : मासिका द्वारे दुर्लक्षित गटापर्यंत शुभवर्तमान पसरविण्यासाठी पुरविलेला आशीर्वादा बद्दल.

**२१ ऑक्टोबर** : ५५व्या वर्षात पदार्पण केल्या बद्दल घेतलेली वार्षिक परिषद आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२२ ऑक्टोबर** : मागील महिन्यातील **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व कार्यक्रमांबद्दल.

**२३ ऑक्टोबर** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांतील मासिक छापून ने प्रसिद्ध करून मिशन क्षेत्रांना पाठविणे शक्य होऊ देत असल्या बद्दल

**२४ ऑक्टोबर** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांवर दर्शवित असलेल्या दये बद्दल.

**२५ ऑक्टोबर** : आमच्या पत्रव्यवहारा द्वारे **बायबलकोर** आणि **थियॉलॉजिकल अभ्यासक्रम** करणाऱ्यांची संख्या वाढत असल्या बद्दल.

**२६ ऑक्टोबर** : आमच्या सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबावरील देवाच्या आशीर्वादा बद्दल.

**२७ ऑक्टोबर** : एको ऑफ हिज कॉल सेवा कार्याचा सर्व स्टाफचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षणा करीत असल्या बद्दल.

**२८ ऑक्टोबर** : आमच्या वरिष्ट पाळकांच्या विविध सेवा कार्याद्वारे सुर्वाता गाजविण्याच्या समर्पितपणा बद्दल.

**२९ ऑक्टोबर** : आपल्या देशाचे रक्षण करीन असल्या बद्दल.

**३० ऑक्टोबर** : इतर सेवा कार्यांना मदत करणे शक्य होऊ देत असल्या बद्दल.

**३१ ऑक्टोबर** : आमच्या सर्व पाठबळ देणाऱ्यां करिता आणि त्यांच्या सेवाकार्यातील सहभागा बद्दल.

**०१ नव्हेंबर** : **सेंट पॉल्स मॅट्रीक्युलेशन स्कूल, नेहम्या बायबल कॉलेज** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक्रमातील** कार्यक्रमा बद्दल.

**०२ नव्हेंबर** : बायबल आणि ख्रिस्ती साहित्य छापण्यात गुंतलेल्या जगभरातील लोकांच्या गरजा पुरवित असल्या बद्दल.

**०३ नव्हेंबर** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस् सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे दैवी रक्षण करीत असल्या बद्दल आणि त्यांना उत्तम आरोग्य पुरविल्या बद्दल.

## प्रार्थने करीत ा मुद्दे

**०४ नव्हेंबर** : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या निवासी आणि सायंकालीन सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तपालन करावे आणि समर्पितपणा राखावा.

**०५ नव्हेंबर** : **एको ऑफ हिज कॉल**च्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांतील सर्व विश्वासणाऱ्याच्या आणि त्यांच्या कुटुंबा करिता.

**०६ नव्हेंबर** : अंमली पदार्थ सेवना पासून लेकरांचे आणि तरुणांचे रक्षण व्हावे.

**०७ नव्हेंबर** : आमच्या सर्व सहसंपादकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या रक्षणा करिता आणि उत्तम शरीर स्वास्थाकरिता.

**०८ नव्हेंबर** : आमच्या संस्थेला, सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबाला आशीर्वाद द्यावा.

**०९ नव्हेंबर** : आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास मार्गदर्शन लाभावे.

**१० नव्हेंबर** : सर्व देशांमध्ये ऐक्य आणि शांति असावी.

**११ नव्हेंबर** : जगातील सर्व लोकांच्या सुरक्षितते साठी आणि कल्याणासाठी.

**१२ नव्हेंबर** : भारतातील दुर्लक्षित गटांशी संपर्क साधता यावा.

**१३ नव्हेंबर** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाला उत्तम शरीर स्वास्थ लाभावे.

**१४ नव्हेंबर** : लहान लेकरांच्या जगभरात होणाऱ्या व्यापारास आळा बसावा.

**१५ नव्हेंबर** : सर्व ख्रिस्ती संस्था आणि उपासना मंदीरांच्या संरक्षणासाठी आणि आशीर्वादासाठी.

**१६ नव्हेंबर** : **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व स्टाफच्या शरीर स्वास्थासाठी आणि संरक्षणासाठी.

**१७ नव्हेंबर** : ओमिकॉर्न आणि बी.ए.२.८६ सारख्या संसर्गजन्य आजाराच्या फैलावास प्रतिबंध व्हावा.

**१८ नव्हेंबर** : सर्व ख्रिस्ती कार्यामध्ये चमत्कार, अद्भुत आणि चिन्हे घडावीत.

(पान ४ वरुन)

असताना अचानक पेत्राने त्याच्याकडे नजर स्थिर केली आणि म्हटले, ''आम्हाकडे पाहा''. पेत्राला त्याच्याकडे लक्ष केंद्रीत कां करावेसे वाटले? टॉम पेत्र आणि योहान यांच्याकडे, कांही वेगळी मागणी करीत नव्हता. इतर रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या सर्वांना विनंती करीत असे तशीच विनंती करीत होता. पेत्राला कळले होते की दोघांच्याहि जीवनात काहितरी महत्वाचे घडणार आहे, त्यामुळे त्याला टॉमने त्याजकडे पूर्ण लक्ष द्यावे असे त्याला हवे होते. तो त्याचा विश्वास कृतित उतरणार होता. त्यामुळेच त्याने टॉमला त्याजकडे पाहाण्यास सांगितले:

पवित्र आत्मा येतो तेव्हा, तो आपल्याला प्रभुसाठी अलौकीक/महान साहसी कृत्य करण्याचे सामर्थ्य देतो. त्यांच्या विश्वासाने कार्य सुरू केले. विश्वास हा कृति करीत होता. आपला विश्वास हा असामान्य विश्वास असावा अशी अपेक्षा करतो.

**१) असामान्य विश्वासास असामान्य दृष्टि हवी असते - जे दिसते त्याच्या पलीकडे पाहाण्या करीता.**

पेत्राने टॉमला त्याच्या शारिरिक स्थितीच्यापलीकडे पाहिले. तो शरिरानें अपंग व्यक्ति आर्थिक स्थान नसलेला अशा भिकारी आणि दैनंदिन जबाबदाऱ्यांसाठी दुसऱ्यावर अवलंबून असलेला असा होता. पेत्र त्याला थोडेसे पैसे देऊन देवाची-आराधना करण्यास पुढे जावू शकत होता, परंतु त्याने मागे थांबून त्या व्यक्तिबरोबर काहि वेळ घालविण्याचे ठरविले पेत्र कदाचीत मंदिरात जाण्यास घाईत असेल तरी देखील त्याने या व्यक्तिसाठी वेळ दिला आपल्या सभोवताली असणाऱ्या लोकांसाठी आपल्याकडे वेळ आहे कां, किंवा आपण आपल्याच कामासाठी धावपळ करीत आहोत ? आपल्या पैकी काहि जणांचे स्वत:वर व्यवसायावर आणि आत्मिक जीवनात इतके गढून गेलेलो असतो, की आपल्या सभोवताली असलेल्या लोकांच्या गरजांकडे तातडीने लक्ष देण्यात अपयशी ठरतो.

येथे पेत्र आपल्याला मंदिरात केवळ एका व्यक्तिसाठी मंदिरात जाण्याऐवजी थांबलेला दिसतो. एका व्यक्ति करिता थांबण्याचे तो त्याच्या स्वामी पासून शिकला असे मला वाटते!

येशू अंजीराच्या झाडावर बसलेल्या **एका व्यक्तिसाठी थांबला.** येशू १२ वर्षे रक्तस्त्रावी अशा एका स्त्री साठी थांबला. एका स्त्रीला भेटण्याकरिता तो विहिरीकडे गेला दकापलीस येथे वादळ पार करून मानसिक व्याधी असलेल्या व्यक्ति साठी गेला. त्यामुळे पेत्राल एका व्यक्तिविषयीचे महत्व समजले असेल!

आपण स्वत:कडे पार पर परिवर्तित होऊ या. कोणाला तरी प्रेम देण्यासाठी, काळजी किंवा लक्ष देण्यासाठी थांबलो ती शेवटची वेळ केव्हाची होती?

पेत्र त्या मनुष्याच्या शारिरीक गरजेच्यापलीकडे असलेल्या त्याच्या आत्मिक मुक्तते कडे पाहू शकत होता. तो त्याला निरखून पाहून म्हणाला, ''आमच्या कडे पाहा''... आपण लोकांच्या शारिरीक परिस्थितिच्या पलिकडे पाहू शकतो का? अनेकदा आपण निकाल देणारे होतो. कोणाला येशूची गरज आहे आणि कोणास नाहि हे आपण ठरवितो. आपणाला बहुतेकदा ''तो/ती ऐकणार नाहि'' किंवा त्याच्याशी/तिच्याशी कोण बोलणार अशी वाक्ये ऐकावयास मिळतात. आपली साक्ष देताना देखील आपण निवड करतो व्यक्तिच्या बाह्य-स्वरूपावर त्याला येशूची गरज आहे किंवा नाहि हे ठरवितो.

आपल्याला जर आपण असामान्य विश्वास कृतीत आणावयाचा असेल तर त्याची सुरुवात असामान्य दृष्टिने आपल्या उघड्या डोळयांना दिसते त्याच्या पलिकडे पाहून केली पाहिजे.

टॉम चमत्काराची अपेक्षा करीत नव्हता, आणि पेत्र देखील बरे करण्याच्या सभेचे आयोजन करीत नव्हता. त्यांनी त्यांच्या असामान्य विश्वास कृतित उतरविण्यांचे इच्छिले तेंव्हा ते घडून आले. तुम्ही तुमचा असामान्य विश्वास कृतित उतरविण्याचे इच्छित आहा कां?

निरखून पाहाण्या करीता आपले नेत्र स्थिर करणे तुमच्या मंडळीतील सभासदां कडे ते कोण आहेत, कोठून येत आहेत आणि ते कशासारखे दिसत आहेत. हे सर्व निरखून पहाण्याचा प्रयत्न केल्याची

(...पान ८ वर)


# नहेम्या बायबल सायं कॉलेज
## चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

**माध्यम : तमिळ**

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**ईश्वरविद्या सर्टीफिकेट : अेक वर्ष**
**ईश्वरविद्या डिप्लोमा : दोन वर्ष**
**ईश्वरविद्या पदवीधर: तीन वर्ष**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१८. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
१९. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२०. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२१. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२२. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२३. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२४. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२५. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२६. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२७. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
२८. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
२९. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**
Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## अभिवचनांचे पालन करणारा देव

## तुझ्यावर चालविण्याकरिता घडिलेले कोणतेही हत्यार तुजवर चालणार नाही.

**(यशया : ५४-१७)**

प्रभु परमेश्वराने मला १९६९ साली त्याच्या गौरवी सेवे करिता पाचारण केले. पुनः एकवार १९७१ साली त्याने मला यिर्मया ५१:२०-२३ या वचनातील त्याच्या अश्वासना द्वारे उत्तेजन दिले.

“**तू माझा परशु आहेस, तू माझी युद्धशस्त्रे आहेस; तुझ्या द्वारे मी राष्ट्रे मोडून त्यांचे तुकडे तुकडे करीन, तुझ्या द्वारे राज्य नष्ट करीन;**
**तुझ्या द्वारे मी घोडा व स्वार यांचे तुकडे तुकडे करीन;**
**तुझ्या द्वारे मी रथ व सारथी याचे तुकडे तुकडे करीन;**
**तुझ्या द्वारे मी नरनारींचे तुकडे तुकडे करीन;**
**तुझ्या द्वारे मी वृद्ध व तरुण व तरुणी यांचे तुकडे तुकडे करीन;**
**तुझ्या द्वारे मी मेंढपाळ व त्याचा कळप यांचे तुकडे- तुकडे करीन, तुझ्या द्वारे शेतकरी व त्याच्या बैलांची जोडी यांचे तुकडे तुकडे करीन आणि तुझ्या द्वारे मी अधिपतींचे व नायब अधिपतींचे तुकडे तुकडे करीन**”.

हि अभिवचने माझ्या सेवेत पूर्ण झाली आहेत, कारण **एको ऑफ हिज कॉल** या सर्व भागांनी वेढले गेले आहे, सध्या या सेवा वेगवेगळ्या करण्यात येत आहेत. आपका प्रभु त्याच्या दिलेल्या अभिवचनाविषयी विश्वनिय आहे.

या वचनाच्या पूर्णतेकडे पाहू या, “**तू माझा परशु आहेस, तू माझी युद्धशस्त्रे आहेस... तुझ्या द्वारे मी अधिपतींचे व नायब अधिपतींचे तुकडे तुकडे करीन**” वचने २० आणि २३.

मी १९७८ ते १९८० या दरम्यान शासकीय सेवेत असताना, चेन्नाईला समुद्र किनाऱ्या जवळील शासकीय निवासात रहावे लागले होते. त्या काळात मी विभागात राहाणाच्या शासकीय अधिकाऱ्यांना सुवार्ता संदेश देण्या करीता वरच्या मजल्यावर असलेला एक हॉल भाड्याने घेतला. अनेक उच्च पदावर असलेल्या अधिकाऱ्यांना देवाने स्पर्श केला आणि शारिरीक व आत्मिक आशीर्वाद दिला ज्या ज्या वेळेस संधी प्राप्त होत असे, मी उघड्या जागे वर सभा घेऊ लागलो. त्यावेळेस काही लोकांना हे माझे करणे आवडले नाहि आणि त्यांनी इतरांना माझ्या कार्यात अडथळे आणण्यास चिथावणी दिली. ते दूर वर उभे राहून, मला घाबरविण्यास मोठ्याने आवाज करीत असत. काही वेळा तर सभेला लोक गोळा झाले की ते मला घेराव घालीत असत. ते दुचाकीवर बसून हातात धारदार शस्त्रे घेऊन येत असत. मी शारिरीक हल्ले देखील अनुभवले, ज्यामुळे माझ्या मनात भीति उत्पन्न होई. त्यात भर म्हणून, हॉलच्या मालकाला गाठून मला हॉल भाड्याने देण्यास मनाई केली.

सर्व आवाहने असताना देखील देवाने मला सोडले नाहि, त्यागले नाहि, उलट माझ्या दर्जात वाढ केली आणि त्याचा सामर्थ्यशाली हात सदैव मजवर होता. मी विरोध करणाऱ्यांना देवाने क्षमा करावी व त्यांचे तारण करावे अशी प्रार्थना करीत असे. त्यांच्या पैकी अनेकांना भी भेटू शकलो नाहि तरी त्यांच्या पैकी काहि जणांशी मला समोरा समोर बोलता आले आणि देवाने त्यांची भेट घेऊन त्यांना तारण दिले.

स्तोत्र कर्ता स्तोत्र ३४:८ या वचनात म्हटल्या प्रमाणे “**परमेश्वर किती चांगला आहे याचा अनुभव घेऊन पाहा, त्याजवर भाव ठेवितो तो पुरुष धन्य**”.

*************

(पान ६ वरुन...)

शेवटची वेळ केव्हाची होती? निरखून पाहाण्या करिता थोडा वेळ द्या.

वार्नबसने शौल आणि मार्क योहान यांच्यामध्ये निरखून पाहिल्यामुळे काहितरी विशेष पाहिले. प्रभु करो आणि आपल्या लोकांकडे त्यांच्या शारिरीक बाह्य स्वरुपाच्या पलिकडे त्यांच्या आत्मिक गरजांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन देवो.

### २) असामान्य विश्वास असामान्य धैर्य निर्माण करितो:-

आपल्या पैकी बहुतेकांना आपल्याच दिनचर्येत राहाण्यास, सुरक्षित क्षेत्रात राहण्यास आवडते, विशेषत: वय वाढत असताना आपल्या पैकी कांहि जणांची साहसी - धाडसी वृत्ती कमी होते, आणि मी स्वत:ला या वर्गात समाविष्ट करीते. मी पुर्वी रोलर कोस्टर आणि वाहानांतून धोकादायक प्रवासा सारख्या साहसी कार्यक्रमात सहभागी होत असे आणि अनपेक्षित अपेक्षापूर्वीचा आनंद उपभोगीत असे. तरी जस जसा वेळ जाऊ लागला माझ्या दृष्टीकोनांत बदल झाला. मी स्वत:तला प्रश्न विचारु लागले, की मी उगाच धोकादायक जोखीम का पत्करावी, आणि तसे करताना काहि चुकीचे घडले तर? माझ्या प्रमाणेच अनेकांना सुरक्षित रहावेसे वाटते.

जसे, आपण आपल्या खिशात सुटे पैसे नसल्यावर भिक न देता पुढे जात असतो तसेच पेत्राला योहाना बरोबर बोलण्यात

व्यस्त राहत त्या मनुष्याकडे दुर्लक्ष करून पुढे जाता आले असते; परंतु त्याने दुर्लक्ष न करीता धाडसी पाऊल उचलले आणि म्हटले, ''माझ्याजवळ सोनेरुपे कांही नाही, जे आहे ते तुला देतो.''

हि केवळ एक धाडसाची केलेली कृति नव्हती तर असामान्य कृति होती. पेत्र त्याचा विश्वास त्या मनुष्यात घालत होता. हि घटना प्रे. कृ. १४:८-१९ या वचनात नमूद केलेल्या घटने सारखीच आहे, ज्या मध्ये पौल एका मनुष्याला बरे करीतो. पौलाने ज्या व्यक्तिला बरे केले त्याला ''बरे होण्या करीता विश्वास होता'', उलटपक्षी ज्या मनुष्याला पेत्राने बरे केले, त्या मनुष्यात विश्वास होता असे बायबल मध्ये नमुद करण्यात आलेले नाहि. कसे का असेना, पेत्र आणि योहान यांनी या मनुष्याच्या जीवनात विश्वास घातला.

देवाने आपल्याला आपल्या सभोवताली असलेल्या लोकांच्या जीवनात विश्वास देण्यासाठी पाचारण केले आहे. आपण देव आहोत का? बहुतेक वेळा ज्यांच्यामध्ये विश्वास आहे अशानाच तो देण्यात आनंद मानितो, परंतु इतर विश्वासातील लोकांना किंवा ज्यांच्या मध्ये आजिबात विश्वास नाही अशा लोकांना तो वाटण्याचा किंवा सांगण्याची वेळ येते, आपण कचरतो, मागे-पुढे होतो.

प्रिय मित्रांनो, आपल्या सभोवताली असणाऱ्या लोकांच्या जीवनात आपला विश्वास दर्शविण्याची हि वेळ आहे. आपण आपला वेळ कोणाच्या तरी जीवनात विश्वास पेरण्यासाठी खर्च करुया.

पेत्राला त्याचा दृढ न ढळणारा विश्वास कृतित उतरविण्याचे धैर्य होते. तो मनुष्य बरा झाला नाहि तर काय होईल याविषयी त्याच्या मनात क्षणभरासाठी देखील संशय आला नाही. पेत्राने अतिशय आत्मविश्वासाने ''उठ आणि चालू लाग'' असे बोलला. तो मनुष्य पेत्राची सहज समजण्यासारखी आज्ञा समजू शकत नाहि. कारण ७व्या वचनात सांगितले गेले आहे. पेत्राने म्हटले - ''उठ आणि चालू लाग.''

आज असे लोक आहेत जे आपण त्यांचा उजवा हात धरुन त्यांना उभे करण्याच्या प्रतिक्षित आहेत. ते देवाच्या समक्षतेत येण्याच्या अतिशय जवळ आहेत, परंतु दाराच्या बाहेर थांबलेले आहेत. त्यांसाठी असामान्य धैर्याची आवश्यकता आहे.



*येशू ख्रिस्ताच्या नामाने बरे होणे*

पेत्र आणि योहान टॉम मुळे अडखळले नाहित, तर उलट त्याजकडे सामर्थ्याने शुभवर्तमान सांगून देवाचे सामर्थ्य सिद्ध करू शकणारी व्यक्ती म्हणून पाहिले.

ख्रिस्तीजणांनी स्वत:स त्यांच्या विश्वासाच्या चालण्या पासून दूर करु नये, हे अतिशय महत्वाचे आहे. देवाबरोबर एकट्याने वेळ घालविणे चांगले आहे, तितकेच इतरांसाठी वेळ, प्रयत्न आणि साधने खर्च करणे तितकेच महत्वाचे आहे. तुमच्या सभोवताली असणाऱ्या हजारो लोकांच्या जीवनात असामान्य धैर्याने जीवना विषयी बोला. सहजपणे वागू नका!

## ३) असामान्य विश्वास असामान्य आवाहने आणतो.

आपला विश्वास न ढळणारा असतो जेव्हा तो आपल्याला असामान्य विश्वासा प्रत नेतो आणि पुढे आणि असामान्य आवाहन आणतो. ख्रिस्ती मार्ग हा असंख्य आवाहनांनी भरलेला असा आहे आणि बायबल मध्ये त्याचा फुलांची शय्या असा उल्लेख करीत नाहि. आपण स्वत:चा त्याग करुन वध:स्तंभ उचलला पाहिजे.

जीवनास कलाटणी देणारा चमत्कार अनुभवल्या नंतर पेत्र आणि योहान यांचा सन्मान, किंवा गौरव करण्यात आला नाहि तर उलट बंदिग्रहात टाकण्यात आले.

माझ्या प्रिय मित्रांनो, सैतान आपल्या जीवनासाठी असलेल्या देवाचा उद्देश आपल्याला पूर्ण करता येवू नये यासाठी शक्यतो सर्व अडखळणे आणील. तरी, मानवी शक्ति किंवा नरक देखील आपल्या देवाचा दैवी योजना थांबवू - रोकू शकत नाहि.

पेत्र आणि योहान यांना बंदिखान्यात टाकण्यात आले, गंभीरपणे धमकावण्यात आले आणि येशू विषयी बोलू नये असे आज्ञापिण्यात आले, परंतु त्यांना कोणीहि थांबवू शकले नाहि.

माझ्या प्रिय मित्रांनो, असामान्य वेळ असामान्य परिणाम आणते. आपण आपला विश्वास कृतित उतरवितो, तेव्हा आपल्याला पुष्कळशा समस्या आणि आवाहानांना सामोरे जावे लागेल, परंतु आपण विश्वास राखून ठेविला पाहिजे आपले पारितोषिक स्वर्गात आहे, त्यासाठी आपण आपल्या पाचारणात विश्वासू राहिले पाहिजे. आपण मागे पाहू नये किंवा मागे फिरु नये, तर उलट पुढे पुढे जात राहावे.

प्रे.कृ. १४:२२ आपल्याला आठवण करून देत आहे. ''**आपणांला पुष्कळ संकटांतून देवाच्या राज्यात जावे लागते. आपली चित्ते स्थिरावून विश्वासात टिकून राहावे.**''

स्तोत्र ३४:१९ ''**धार्मिकाला बहुत कष्ट होतात; तरी परमेश्वर त्या सर्वांतून त्याला सोडवितो.**''

देवाला भिऊन वागणारे जीवन आम्हाला सहनापासून सुटका देत नाहि. संपूर्ण इतिहासात विश्वासातील स्त्री आणि पुरुष यांनी परिक्षा आणि त्रास अनुभविले आहेत. समस्या हि ख्रिस्ती आणि ख्रिस्ती नसणाऱ्या उपासनेला जाणाऱ्या आणि न जाणाऱ्या अशा सर्वांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्याचा अर्थ असा होत नाहि कि तुम्ही वाईट किंवा दुष्ट व्यक्ति आहात. तरी देवाचे लेकरु जेव्हा परिक्षांच्या अनुभवातून जात असते, तेव्हा त्याला निश्चित आश्वासन असते कि ते सर्व देवाला ठाऊक असते आणि त्याच्या हातात ते सुरक्षित असते हाच फरक असतो.

तुमची परिस्थिती कितीहि निराशजनक असेल, तुम्ही एकटे नाहित. देवाला तुमची काळजी आहे आणि तो तुमच्या धडपडण्यात तुमच्या सोबत आहे. आज असामान्य विश्वास कृतित उतरवा.

* * * * * * *


## NEED LIBRARY BOOKS

We need Tamil, English and Hindi books for our Libraries at **St. Paul's Matriculation School and Nehemiah Bible Colleges.** If you have new or old books in good condition and if you are willing to donate, kindly communicate with us.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

# URGENT

We need about 1000 Hindi Christian Books for our Nehemiah Bible Colleges. Please inform us the possibility of procuring the theological Hindi books.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

## OUR BANK DETAILS:

### 1. Bank : State Bank of India

Branch : Triplicane, Chennai-5
Name : S. Sam Selva Raj
A/C No. : 1023 2934 679
IFSC : SBIN 00 00 249
SWIFT CODE : SBI NIN BB 455

### 2. Bank : ICICI Bank

Branch : Anna Salai, Chennai-6
Name : Echo of His Call
A/C No. : 6038 0502 2319
IFSC : ICIC 000 6038

### 3. Bank : State Bank of India

(This Account is for Tax Exemption for Indians only )

Branch : Triplicane, Chennai-5
Name : Echo of His Call Educational Trust
A/C No. : 1023 2923 805
IFSC : SBIN 00 00 249

Google Pay: 98410 71858
PayPal : SAM SELVA RAJ
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/- आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"
on 12th OCTOBER 2023
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

## JESUS LOVES YOU!

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**